# रत्नागिरी जिल्हा महिला सहकारी पतसंस्था मर्यादित, रत्नागिरी

२९ वा
वार्षिक अहवाल
सन २०२०-२०२१

नोंदणी क्र. आर.टी.जी.(आर.टी.जी.)आर.एस.आर(सी.आर)/१०१/९१-९२
पारसमणी, गाळा नं. ४६,४७,४८,४९, दुसरा मजला, मारुती मंदिर, रत्नागिरी. फोन नं. (०२३५२) २२७१२४ / ८६९८२२८०७०
स्थापना - २ एप्रिल १९९२

## - तिसावी वार्षिक अधिमंडळ सभेची सूचना -

### (फक्त भागधारक सभासदांसाठी)

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची तिसवी वार्षिक अधिमंडळाची सभा शनिवार दि. २८ ऑगस्ट २०२१ रोजी दुपारी १२.३० वाजता संस्थेच्या प्रधान कार्यालय, रत्नागिरी येथून ''महाराष्ट्र शासन क्रमांक - संकीर्ण-२०२१/ प्र.क्र.२४/ १३-स सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२. दिनांक ३० जुलै २०२१'' नुसार सदर सभा झुम ॲपद्वारे खालील विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी खाली दिलेल्या लिंकद्वारे सभेच्या कामकाजात सहभागी व्हावे ही नम्र विनंती.

### -: सभेपुढील विषय :-

१) मागील दिनांक २७/०२/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक अधिमंडळ सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दिनांक १-४-२०२० ते ३१-३-२०२१ या वर्षाचा अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रके वाचून मंजूर करणे. (पत्रके संस्थेच्या सूचना फलकावर लावलेली आहेत.)
३) सन २०२१-२२ साठीचे अदांजपत्रकास मंजूरी देणे.
४) सन २०२०-२१ या वर्षाच्या वैधानिक लेखा परिक्षणांच्या अहवालाची नोंद घेणे.
५) मागील वर्षाच्या वैधानिक लेखा परिक्षणांच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
६) संस्थेच्या संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२१ सालच्या नफा वाटणीस मंजूरी देणे.
७) संस्थेच्या संचालिका व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
८) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठीचे वैधानिक लेखापरिक्षणासाठी लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे.
९) प्रशिक्षण / कर्ज / गुतंवणुक / वसुली इ. तत्सम विषयाबाबतच्या वार्षिक धोरणांना मान्यता देणे.
१०) क्रियाशील सभासदांसंबधी निकष पुर्ततेची माहिती सादर करणे.
११) वसूल न होणारी कर्जखाती (क्रॉनिक) निर्लेखित करणेबाबत विचार करुन निर्णय घेणे.
१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

ठिकाण - रत्नागिरी
दिनांक - ०७/०८/२०२१

श्रीमती कृतिका कमलाकर सुवरे
मुख्य कार्यकारी अधिकारी

संचालक मंडळाचे हुकुमावरुन
श्रीमती युगंधरा प्रकाश राजेशिर्के
अध्यक्षा

### - सूचना -

१) प्रत्येक सभासदाने आपल्या मोबाईल मध्ये प्ले स्टोअर मध्ये जाऊन zoom app डाऊनलोड करुन ठेवावी व खालील लिंकद्वारे सभेच्या वेळेत सभेच्या कामकाजात भाग घ्यावा.
लिंक - **https://rtnjmahila.ruha.co.in/**
२) सभा निश्चित वेळेत चालू होईल परंतू जर गणपूर्तीचा अभाव असल्यास सदर सभा (ऑनलाईन) अर्धा तास तहकूब ठेवण्यात येईल व तहकूब झालेली सभा उपस्थितांच्या हजेरीत (online) घेतली जाईल (त्यासाठी कोरमची अट असणार नाही.)
३) संस्थेची सन २०२०-२१ सालाची आर्थिक पत्रके व अहवाल पतसंस्थेच्या रत्नागिरी, सावर्डा (चिपळूण), खेड, दापोली, लांजा कार्यालयात सभासदांना माहितीसाठी पहावयास उपलब्ध आहेत.
४) सभेच्या वेळी सभासदांना काही माहिती हवी असल्यास किंवा सभेपुढे सूचना मांडवयाच्या असतील तर लेखी स्वरुपात दि. २०/०८/२०२१ पूर्वी संस्थेच्या कार्यालयात पोहोचतील अशा पाठवाव्यात. त्यानंतर आलेल्या पत्रांचा वार्षिक सभेच्या कामकाजात विचार करता येणार नाही.
५) संस्थेच्या ज्या भागधारक सभासदांनी भाग दाखले संस्थेतून घेतलेले नाहीत ते त्यांनी संस्थेतून घेवून जावेत.